# कृषी क्षेत्रामध्ये देखील घडून आली डिजिटल क्रांती

प्रा. श्वेता मयेकर
सहाय्यक प्राध्यापिका
डॉ. डी. वाय. पाटील कृषी महाविद्यालय, तळसंदे

शेतीमध्ये आज डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. माहिती व तंत्रज्ञानाने शेती क्षेत्रात मोठी क्रांती घडवून आणली आहे, जमीन तयार करण्यापासून ते पीक काढणी, मार्केटिंग, प्रोसेसिंग सर्व क्षेत्रात आमूलाग्र बदल झाले आहे. स्मार्टफोन शेतकऱ्यांपर्यंत पोचले. यामुळे कृषी विषयक माहितीचे वहन शेतकऱ्यांपर्यंत सहज होऊ लागले. या माहितीच्या वाहनांमध्ये मोलाची भूमिका असणारे कृषीविषयक मोबाईल ॲप आपण माहीत करून घेणार आहोत. हे सर्व ॲप प्ले स्टोअरवरून विनामूल्य डाऊनलोड करू शकता.

### कापूस VNMKV:

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ द्वारा तयार करण्यात आलेल्या या ॲपमध्ये कपाशीची सद्यस्थिती, लागवडीची पूर्वतयारी, बीटी वाणांची निवड, कापूस लागवड, बीज प्रक्रिया, अन्नद्रव्य व्यवस्थापन, तणनियंत्रण, पाणी व्यवस्थापन, कापूस वाढ व्यवस्थापन, कीड व्यवस्थापन, रोग व्यवस्थापन, वेचणी व साठवण, कपाशीवरील लाल्याचे व्यवस्थापन, सघन कापूस लागवड यासर्व बाबींबद्दल शास्त्रीय पद्धतीने माहिती दिलेली आहे.

### एकात्मिक तण व्यवस्थापन:

या ऐपमध्ये एकात्मिक तण व्यवस्थापन बद्दल माहिती देण्यात आली आहे. यामध्ये तणांमुळे होणारे नुकसान, पीक-तण स्पर्धा, नियंत्रणाचे उपाय, तणनाशके व त्यांचे प्रकार, तणनाशकाची मात्रा काढणी व विक्री याबद्दल संपूर्ण माहिती दिलेली आहे.

### किसान सुविधा:

२९ मार्च २०१६ रोजी पंतप्रधानांच्या हस्ते याचे उद्घाटन करण्यात आले. हे ॲप हिंदी, इंग्रजी ,पंजाबी, तमिळ आणि गुजराती या भाषेत उपलब्ध आहे. या ॲपमध्ये हवामान, बाजारभाव, वनस्पती संरक्षण, कृषी सल्लागार, केसीसी, विक्रेते, इत्यादी संबंधी माहिती देण्यात आली आहे.

### कृषीदर्शनी:

महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी दरवर्षी प्रकाशित होणारी कृषिदर्शनी डिजिटल पद्धतीने या ॲपमध्ये सादर केली आहे. यामध्ये विद्यापीठाच्या संशोधन शिफारसी, कृषी हवामान पिके, विविध शेती पद्धती, पशुसंवर्धन, जलसंवर्धन, ठिबक सिंचन, भूजल मृदा व जलसंधारण, तणनियंत्रण, कीड व्यवस्थापन, कृषी अवजारे, रेशीम उत्पादन, गांडूळ शेती, आळंबी उत्पादन, विद्युत मोटार आणि सौर ऊर्जा, कृषी तंत्रज्ञान व माहिती केंद्र, कृषी अर्थशास्त्र याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे.

### शेतकरी मासिक ॲप:

कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या द्वारा प्रकाशित होणारे शेतकरी मासिक डिजिटल पद्धतीने या ॲपमध्ये सादर केले आहे. यामध्ये कृषी विद्यापीठ, कृषी विभाग मधील तज्ञ लोकांनी लिहिलेले लेख उपलब्ध आहेत.

### कृषी जागरण:

यामध्ये तज्ज्ञांनी लिहिलेले कृषी विषयक लेख तर मिळतीलच त्याचबरोबर आपण आपला व्यवसाय या ॲपमध्ये नोंदणी करून वाढू शकतो. कीटकनाशकांच्या कंपन्या, कृषी विद्यापीठे आणि कृषी महाविद्यालय, सौर ऊर्जा कंपन्या, नर्सरी ,डेअरी कंपनी, शेतकरी कंपन्या आणि कंपनी विमा, कृषी विज्ञान केंद्र, पोल्ट्री याबद्दल आपणास माहिती मिळेल.

### हळद लागवड तंत्रज्ञान:

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठद्वारा हळद प्रदर्शित ॲप हळद उत्पादक शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. यामध्ये हळदीचे उपयोग, प्रकार, पिकाच्या अवस्था हवामान व जमीन याबरोबरच हळद लागवडीची पूर्व मशागत यासंबंधी सर्व माहिती दिलेली आहे.

### मेघदूत:

भारतीय हवामान विभाग भारतीय उष्णकटिबंधीय हवामानशास्त्र आणि भारतीय कृषी संशोधन परिषदेने विकसित केलेल्या ॲपमध्ये हवामानावर आधारित शेती व्यवस्थापन करण्यासाठी फार उपयुक्त माहिती उपलब्ध आहे. हे ॲप दहा भाषांमध्ये उपलब्ध आहे, या ॲपच्या माध्यमातून तापमान, पाऊस, वाऱ्याचा वेग व दिशा यासंबंधी माहिती शेतकऱ्यांना मिळेल.

### वनश्री:

वनश्री हे मोबाईल ॲप डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठाने केले आहे. यामध्ये लागवडीच्या वेगवेगळ्या पद्धती तसेच आपणास जर रोपांची मागणी करायची असल्यास त्याचेही बूकिंग ॲपवरून करू शकता.

### पीक संरक्षण:

डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली यांच्या द्वारे विकसित झालेले हे ॲप भात, आंबा तसेच काजू लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. या ॲप द्वारे भात, आंबा, काजू या पिकांवर कोणकोणते रोग पडतात तसेच या रोगांपासून आपल्या पिकाचे संरक्षण कसे करावे? त्यासाठी कोणकोणत्या पद्धती वापराव्यात याची माहिती पोहचवली जाते.

★ ★ ★

(संपर्क: +९१ ९१४६९७०७५०)